## बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर
### माहिती कक्ष, दिनांक ०२ जानेवारी २०१९
### जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरांन. व कलम | : | ०१/२०१९ भादविसक ३२४,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | ३१/१२/२०१८ रोजी ०८.३० वा पोपल वस्ती जवळील कॅनलजवळ सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | ०१/०१/२०१९ रोजी ०२.४२ वा |
| फिर्यादी | : | किसन निवृत्ती भिंगारे वय-५७ वर्ष रा. तळे हिप्परगा ता.उ.सोलापूर जिल्हा-सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | ०१.अतुल राजेंद्र धुमाळ रा. तळे हिप्परगा ता.उ.सोलापूर जिल्हा-सोलापूर ०२. जयवंत विठ्ठल धुमाळ रा. तळे हिप्परगा ता.उ.सोलापूर जिल्हा-सोलापूर ०३.विनोद राजेंद्र धुमाळ रा. तळे हिप्परगा ता.उ.सोलापूर जिल्हा-सोलापूर |
| हकिकत | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, दि.३१/१२/२०१८ रोजी रात्रौ ०८.३० वा चे सुमारास पोपल वस्ती जवळील कॅनलजवळ मला व माझे सोबतचे महादेव मारूती भालेराव असे दोंघाना कालचे तक्रारीबद्दल बोलायचे आहे म्हणुन थांबवुन घेऊन १.अतुल राजेंद्र धुमाळ २.विनोद राजेंद्र धुमाळ ३.जयवंत विठ्ठल धुमाळ सर्व रा. तळे हिप्परगा ता.उ.सोलापूर जिल्हा-सोलापूर यांनी काल माझे पुतण्यासोबत गावात झालेले तक्रारीच्या कारणावरून मला का रे तुला जास्त मस्ती आली आहे म्हणुन शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केली व अतुल राजेंद्र धुमाळ याने त्याच्या हातातील लोखंडी रॉडने माझे डावे पायाचे पिंडरीवर मारून मुक्का मार दिला आहे व त्यांनी लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने माझे उजवे डोळ्यावर मुक्का मार लागला आहे व सदर मारहाणीचे वेळी माझे गळ्यातील दोन तोळ्याचे सोन्याचे लॉकेट व खिश्यातील ५,३००/-रूपये कोठेतरी पडुन गहाळ झाले म्हणुन तपास:-पोना/११७६ मनोहर |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरांन. व कलम | : | ०१/२०१९ भादविसक ४२० माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६(ई),६६(ड) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | ३१/१२/२०१८ रोजी ०८.०० वा व्यकंटेश नगर,जुना अ.कोट नाका सोलापूर |

| | | |
|---|---|---|
| गु. दा. ता.वेळ | : | ०१/०१/२०१९ रोजी ०१.३८ वा |
| फिर्यादी | : | विठ्ठल दत्तात्रय वडेपल्ली वय-६३ वर्ष धंदा-सेवानिवृत्त रा. २६, व्यकंटेश नगर,जुना अ.कोट नाका सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | ०१.अनोळखी १ |
| हकिकत | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, दि.३१/१२/२०१८ रोजी मी घरी असताना सकाळी ०८.०० वा माझे मोबाईलवर ९८७५४३७८३४ या वरून अनोळखी व्यक्तीने फोन करून सांगितले कि,मी बँक ऑफ इंडिया कडुन फोन करीत आहे तुमचे एटीएम कार्ड उद्यापासुन बंद होणार आहे व ते अपग्रेड करण्यासाठी तुमच्या एटीएम वरील नंबर ४५९८४५९००००१९५०३ हा बरोबर आहे काय असे म्हणाले वर मी BOI चे ATM कार्डावरील नंबर पाहुन तो बरोबर असल्याचे सांगितल्यावर त्याने मला एटीएम कार्ड चे पाठीमागील तीन अंक सांग म्हणाल्यावर मी एटीएम चे कार्ड चे मागे असलेला ९६५ हा नंबर त्यास सांगितला लगेच तुम्हाला एक मेसेज तुमच्या मोबाईल नंबर येईल असे म्हणुन फोन बंद केला. त्यानंतर त्याचा फोन मला आला त्याने मला SMS चे OTP नंबर कळवा असे म्हणाले वर माझ्या मोबाईल मध्ये आलेले SMS मधील OTPनंबर सांगितला त्यानंतर सकाळी ०८.२० वा चे दरम्यान माझे ATM मधुन प्रथम १०००/-,२०००/-,२०००/-,१९९९९/-,४९९९/-,१९९९९/- असा एकुण ४९,९९७/-असे मोबाईल धारक ९८७५४३७८३४ यांनी काढुन माझी फसवणुक केली आहे सदर मोबाईल धारक हा हिंदी भाषेत बोलत होता.तसेच आमच्या प्रमाणेच सियोन मधुकर कांबळे वय-२४ रा.निलम नगर प्लॉट नं.०४,घर.नं.०४ सोलापूर यांना आज रोजी दुपारी ०२.४५ वा त्याचा नंबर ८४४६९६६६८४ यावर ७५४६०५०४०३ यावरून एटीएम नंबर व मागचा CVV तीन अंकी नंबर सागुन तुमचे नवीन वर्षापासुन एटीएम कार्ड रिनिव्ह करण्याचे आहे असे सांगुन मी सांगितलेले नंबर बरोबर आहेत काय असे विचारले तेव्हा त्याने बँक मॅनेजर बोलत आहे मी बँक मॅनेजर राहुल मिश्रा बोलत आहे त्यानंतर त्याचे मोबाईल वर लगेज मेसेज आला व त्याने ७ अंकी नंबर सांगण्यास सांगितल्यावर फोन बंद झाल्यानंतर दुपारी ०३.१३ वा त्याचे मोबाईलवर मेसेज आला त्यात २०,०००/-रू काढुन घेतल्याचे दिसत आहे अशा प्रकारे माझी व सियोन कांबळे यांची आर्थिक फसवणुक झाली आहे. म्हणुन तपास:-पोनि/पवार |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरांन. व कलम | : | ०६/२०१९ भादविसक ३०४-अ,२७९ मो.वा.का.कलम ११९,अ.ब.१८४ प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | ०१/०१/२०१९ रोजी रात्रौ ११.०० वा शांती चौक ते बोरामणी नाका डांबरी रस्त्याचे मधील डिव्हायडर लगत सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | ०२/०१/२०१९ रोजी ०४.२१ वा |
| फिर्यादी | : | किसन श्रावण रणदिवे वय-४५ वर्ष व्यवसाय-सफाई कामगार रा. घ.नं.२०८/११,रविवार पेठ जुना बोरामणी नाका सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | ०१.अज्ञात वाहन चालक |
| हकिकत | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यात अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने हयगईने चालवुन पायी चालत रस्ता ओलांडणारा माझा पुतण्या नामे अरूण पांडुरंग रणदिवे वय-२१ रा. घ.नं.२०८/११,रविवार पेठ जुना बोरामणी नाका सोलापूर यास धडक देवुन त्याचे मरणास कारणीभुत ठरला आहे म्हणुन तपास:-मपोसई/जाधव |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| गुरांन. व कलम | : | ०१/२०१९ भादविसक ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ .ठिकाण | : | ३१/१२/२०१८ रोजी ०९.१५ वा सरस्वती चौक सोलापूर |
| गु. दा. ता.वेळ | : | ०१/०१/२०१९ रोजी ०२.३९ वा |
| फिर्यादी | : | इमरान रफिक शेख वय-१७ वर्ष रा. १०२ मुरारजी पेठ पाटील वस्ती सोलापूर |
| आरोपीचे नांव | : | ०१.अनोळखी २ |
| हकिकत | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, दि.३१/१२/२०१८ रोजी रात्रौ ०८.४५ वा चे सुमारास गल्लीतील जाबाज खताल शेख याची होंडा शाईन मोटार सायकल नं.एमएच-१३-सीवाय-६११४ यावरून रोडने चाळीत इस्त्रीचे कपडे देण्यासाठी येवुन कपडे देवुन एन जी मिल चाळीतुन रसिक हॉटल समोरून घराकडे जात असताना साधारण ०९.१५ वा चे सुमारास सरस्वती चौकाकडुन एक मोटार सायकल वर दोन अनोळखी इसम समोरून आले त्यावेळी सदर मोटार सायकल वरील चालकाने मला कट मारून खाली पडल्यावर दोघेजण यांनी मला आईघाल्या मादरचोद असे म्हणुन शिवीगाळ चालू करून मला खाली पाडुन हाताने व लाखाबुक्यांनी मारहाण करणेस चालु करून दोघांची त्याचे हातातील ब्लेड |

| | | |
|---|---|---|
| | | सारखे हत्याराने माझ्या उजवे खांद्याचे पाठीवर जखमी केले होते व त्यावेळी गल्लीतील उस्मान कमालसाब नदाफ हे मला विचविणेसाठी आल्यावर दोघेजण गाडीवरून पळुन गेले होते.म्हणुन तपासः-पोहेकॉ/६९३ शिंदे |